# राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र

क्र.रानिआ/ मनपा-२०२५/आचारसंहिता/प्र.क्र.८६/का.५
नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ०१/०१/२०२६

संदर्भ :- १.राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक: रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.४२/का.०६ दि.२४ नोव्हेंबर २०१६

२.राज्य निवडणूक आयोगाचे क्रमांक: रानिआ/नप-२०१६/प्र.क्र.४२/का.०६ दि.२७ डिसेंबर २०१६.

३.राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मनपा-२०२५/प्र.क्र.६/का-५ दि.१६ जुलै २०२५

४.राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/मावज/२०२५/प्र.क्र.५/का.१० दि.०९ ऑक्टोबर २०२५

५.राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ/जिपपंस-२०२५/ प्र.क्र.४१/का.७ दि.०४ नोव्हेंबर २०२५ (कायदा व सुव्यवस्थेबाबत एकत्रित आदेश)

६.राज्य निवडणूक आयोगाचे आदेश क्र.रानिआ /जीपपंस-२०२५/प्र.क्र.४२/का.७, दि.०४ नोव्हेंबर २०२५ (आदर्श आचारसंहितेचा एकत्रित आदेश)

ज्याअर्थी, भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए अन्वये राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांचे पर्यवेक्षण, संचालन व नियंत्रणाची जबाबदारी राज्य निवडणूक आयोगाची आहे.

ज्याअर्थी, राज्य निवडणूक आयोगाने निवडणूक प्रक्रिया शांत, निर्भय, मुक्त व पारदर्शक वातावरणामध्ये पार पाडण्याच्या अनुषंगाने संदर्भाधीन आदेशान्वये खालील बाबींच्या अनुषंगाने सविस्तर आदेश दिलेले आहेत:-

i. निवडणूक प्रक्रिया कर्तव्यदक्ष व नि:पक्ष अधिकारी यांच्याद्वारे हाताळणे.

ii. आचारसंहितेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी पोलीस व इतर विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना करणे.

iii. आचारसंहितेच्या अनुषंगाने एकत्रित आदेश -२०२५.

Scanned with OKEN Scanner

iv. प्रसारमाध्यम संनियंत्रण व जाहिरात प्रमाणन आदेश, २०२५.

ज्याअर्थी, उपरोक्त आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता राज्यातील निवडणूक यंत्रणेबरोबर पोलीस यंत्रणेचा देखील नि:पक्षपाती सहभाग असणे आवश्यक असून, त्याअनुषंगाने एकत्रित आदेश देणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये कायदा व सुव्यवस्था राखून आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी व्हावी यासाठी भारतीय संविधानाच्या अनुच्छेद २४३ के व २४३ झेडए तसेच मुंबई महानगरपालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १८ ए (४), महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या कलम १४ (४), महाराष्ट्र नगरपालिका, नगर पंचायत आणि औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ च्या कलम १०-ए (४), महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या, अधिनियम, १९६१ (सन १९६२ चा महा ५) च्या कलम ९-ए (४), मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ (सन १९५९ चा मुंबई ३) च्या कलम १०-ए (४) अनुसार प्राप्त अधिकारांचा वापर करून, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका स्वच्छ, पारदर्शक, मोकळ्या व भयमुक्त वातावरणात व्हाव्यात यासाठी पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत :-

## आदेश

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणूक कालावधीमध्ये आदर्श आचारसंहितेची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी यासाठी क्षेत्रीय स्तरावर निर्माण करण्यात आलेल्या विविध तपासणी पथके (FST, SST, VST, इत्यादी) मार्फत करण्यात येणाऱ्या कारवायांमध्ये रोख रक्कम/मुद्देमाल आढळून आल्यास त्यावर पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी:

१. तपासणी पथकाने प्रथमत: आढळून आलेल्या रोख रक्कम/मुद्देमाल धारण करणाऱ्या व्यक्तीने संबंधित व्यवहाराच्या संदर्भात योग्य ती कागदपत्रे, उदा.GST Invoice (CGST Rule 55 of 2017), वस्तुच्या मालकाचे नाव असलेले अधिकारपत्र, डिलिव्हरी चलान (CGST Rules 2017), Stock Summary ची प्रमाणित प्रत, वस्तूची/रकमेची वाहतूक करणाऱ्या वाहकांचे फोटो ओळखपत्र,रोख रक्कम/दागिने इत्यादींच्या खरेदीविक्री व वाहतुकीबाबत सक्षम प्राधिकऱ्याकडून घेतलेली पूर्व परवानगी, इत्यादी बावतचे नियमानुसार आवश्यक पुरावे सादर केल्यास संबंधित रोख रक्कम/मुद्देमाल त्या व्यक्तीला परत करावी. जर एखाद्या वाहनात रुपये १० लाखांपेक्षा जास्त रोख रक्कम सापडून आल्यास त्यासंदर्भात ते धारण करणाऱ्या व्यक्तीने ती रक्कम/मुद्देमाल कोणत्याही उमेदवार/प्रतिनिधी/राजकीय पक्षाचे पदाधिकारी किंवा कोणत्याही गुन्ह्याशी संबंधित नाही असे पुरावे अथवा कागदपत्रे सादर केले तरीही सदर रक्कम/मुद्देमालाबाबत पथक प्रमुखांनी आयकर विभागास कळवावे. त्यानंतर त्यावरील पुढील कार्यवाही त्या विभागाच्या नियम/कायद्यानुसार आयकर विभाग करेल. तसेच याबाबतची नोंद दैनंदिन नोंदवहित

Scanned with OKEN Scanner

घेऊन त्यावर पथक प्रमुखाची स्वाक्षरी घ्यावी. अशाप्रकरणी पुढे करण्यात आलेल्या कार्यवाहीबाबत दैनंदिन अहवाल (MCC II) च्या शेरा रकान्यात स्पष्टपणे नोंद करावी.

२. रोख रक्कम/मुद्देमाल धारण करणारी व्यक्ती तात्काळ पुरावे सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्या व्यक्तीस पुरावे सादर करण्यासाठी २४ तासांची मुदत द्यावी. संबंधित रोख रक्कम/मुद्देमाल पथक प्रमुखांनी जप्त करावा. त्याबाबतची पावती रोख रक्कम/मुद्देमाल धारण करणाऱ्या व्यक्तीस देण्यात येईल.त्यानंतर जप्त केलेल्या रोख रक्कम/ मुद्देमालाबाबत पुढीलप्रमाणे कार्यवाही करावी:

I. जप्त केलेली रोख रक्कम दोन लाखांपेक्षा कमी किंमतीची/मुद्देमाल दोन लाखांपेक्षा कमी किंमतीचा असल्यास; संबंधित रोख रक्कम/मुद्देमाल निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नियुक्त केलेल्या आचारसंहिता प्रमुखांच्या ताब्यात ठेवण्यात यावा. २४ तासांच्या मुदतीमध्ये रोख रक्कम/मुद्देमाल धारण करणाऱ्या व्यक्तीने नियमानुसार आवश्यक पुरावे सादर केल्यास संबंधित रोख रक्कम/मुद्देमाल त्या व्यक्तीला परत करावा. रोख रक्कम/मुद्देमाल परत केल्याबाबतची पोच त्या व्यक्तीकडून घेऊन या कार्यवाहीबाबत दैनंदिन अहवाल (MCC II) च्या शेरा रकान्यात स्पष्टपणे नोंद करावी.

II. जप्त केलेली रोख रक्कम दोन लाखांपेक्षा अधिक किंमतीची/मुद्देमाल दोन लाखांपेक्षा अधिक किंमतीचा असल्यास यावर निर्णय घेण्यासाठी एक समिती स्थापन करावी. ह्या समितीमध्ये पुढीलप्रमाणे तीन सदस्यांचा समावेश असेल:

१. निवडणूक निर्णय अधिकारी यांनी नेमलेले सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी (अध्यक्ष)

२. निवडणूक खर्च पथक प्रमुख

३. आचारसंहिता पथक प्रमुख

२४ तासांच्या मुदतीमध्ये रोख रक्कम/मुद्देमाल धारण करणाऱ्या व्यक्तीने ह्या समितीसमोर नियमानुसार आवश्यक पुरावे सादर केल्यास संबंधित रोख रक्कम/मुद्देमाल त्या व्यक्तीला ह्या समितीमार्फत परत करण्यात यावा. रोख रक्कम/ मुद्देमाल परत केल्याबाबतची पोच त्या व्यक्तीकडून घ्यावी. जर एखाद्या वाहनात रुपये १० लाखांपेक्षा जास्त रोख रक्कम सापडून आल्यास त्यासंदर्भात ते धारण करणाऱ्या व्यक्तीने ती रक्कम/मुद्देमाल कोणत्याही उमेदवार/प्रतिनिधी/राजकीय पक्षाचे पदाधिकारी किंवा कोणत्याही गुन्ह्याशी संबंधित नाही असे पुरावे अथवा कागदपत्रे सादर केले तरीही सदर रक्कम/मुद्देमालाबाबत पथक प्रमुखांनी आयकर विभागास कळवावे. त्यानंतर त्यावरील पुढील कार्यवाही त्या विभागाच्या नियम/कायद्यानुसार आयकर विभाग

Scanned with OKEN Scanner

करेल. या कार्यवाहीबाबत दैनंदिन अहवाल (MCC II) च्या शेरा रकान्यात स्पष्टपणे नोंद करावी.

३. कोणत्याही परिस्थितीत, जप्त केलेल्या रोख रक्कम/मुद्देमाल मतदानाच्या तारखेपासून ७ (सात) दिवसांपेक्षा जास्त काळ प्रलंबित ठेवता येणार नाही (एफआयआर/गुन्हा/तक्रार दाखल झालेली प्रकरणे वगळून). असे प्रकरण समितीपुढे आणून त्याबाबत समितीचे आदेश प्राप्त करून घेण्याची कार्यवाही निवडणूक खर्च पथक प्रमुखाने करावी.

४. रोख रक्कम/मुद्देमाल धारण करणारी व्यक्ती २४ तासांच्या मुदतीमध्ये पुरावे सादर करण्यास असमर्थ ठरल्यास त्या व्यक्तीविरोधात संबंधित अधिनियम/नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात यावा व जप्त रोख रक्कम/मुद्देमाल पोलीस विभागाच्या स्वाधीन करावा. पोलीस विभागाने त्या गुन्हाचा पुढील तपास बीएनएस (BNS), बीएनएसएस (BNSS) व इतर अधिनियमांच्या/नियमांच्या तरतुदीनुसार करावा.

मा. राज्य निवडणूक आयुक्त, यांच्या आदेशानुसार,

आपला,

०१.०१.२०२६

(सुरेश काकाणी)
सचिव,
राज्य निवडणूक आयोग, महाराष्ट्र.

Scanned with OKEN Scanner